शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी देताना तसेच शासकीय जमिनीचे मुल्यांकन करताना वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार मुल्यांकन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. जमीन-११/२००७/प्र.क्र. ९८/ज-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २९/४/२००८.

वाचा:- १) शासन निर्णय, म.व व.वि. क्र. जमीन-१०/२००२/प्र.क्र. ३८७/ज-१. दि.२९/५/२००६.

२) शासन परिपत्रक म.व व.वि. क्र. जमीन-११/२००७/प्र.क्र. ९८/ज-१, दि.३१/१२/२००७.

प्रस्तावना :-

शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी देताना तसेच शासकीय जमिनीचे मुल्यांकन करताना वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार मूल्यांकन करण्याच्या सूचना वरील शासन निर्णय/परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यांमध्येच मूल्यांकनाबाबतच्या मार्गदर्शक सूचनाही अंतर्भूत आहेत. त्यामुळे शासकीय जमिनीच्या मुल्यांकनासाठी वार्षिक बाजारमूल्य दर तक्ते वापरताना मुल्यांकनाबाबतच्या सूचनादेखील विचारात घेणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ च्या नियम ४ मधील तरतुदीनुसार दरवर्षी बाजारमूल्य दर तक्ते नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत प्रसिध्द केले जातात. वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यांमधील मार्गदर्शक अंमलबजावणी सूचना (Valuation guidelines) मध्ये स्थूल जमिनीच्या मुल्यांकनाबाबतच्या सूचनांचा देखील अंतर्भाव करण्यात आला आहे. त्या सूचना शासकीय जमिनीच्या मूल्यांकनासाठी ग्राह्य धरण्यात याव्यात. दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्यामधील स्थूल जमिनीच्या मुल्यांकनाच्या, प्रादेशिक योजना/विकास योजनेनुसार रहिवास/वाणिज्य/औद्योगिक, इत्यादी वापर विभागामध्ये समाविष्ट असलेले क्षेत्र तसेच संभाव्य बिनशेती व बिनशेती या मुल्य विभागातील क्षेत्रासाठीच्या सदर मार्गदर्शक सूचनांमधील परिशिष्ट-ब मध्ये दिलेल्या टप्पा पध्दतीत नमुद केलेल्या क्षेत्रनिहाय टप्प्याऐवजी खालील प्रमाणे क्षेत्रनिहाय टप्पा पध्दत विचारात घेवून, राज्यातील शासकीय जमिनीचे मूल्यांकन करणे आवश्यक असलेल्या सर्व प्रकरणांमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे मुल्यांकन करण्यात यावे.

| अ. क्र. | क्षेत्रफळ | केवळ प्रती चौ.मी. दर दिले असल्यास प्रती चौ.मी. मूल्यदराची विचारात घ्यावयाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ० ते २,००० चौ.मी. पर्यंत | १०० % |
| २ | २,००० चौ.मी. चे पुढे ४,००० चौ.मी. पर्यंत | ९० % |
| ३ | ४,००० चौ.मी. चे पुढे ६,००० चौ.मी. पर्यंत | ८० % |
| ४ | ६,००० चौ.मी. चे पुढे १०,००० चौ.मी. पर्यंत | ७० % |
| ५ | १०,००० चौ.मी. चे पुढे | ६० % |

कृमाप.....

२. वरील तक्त्यात नमूद केलेल्या जमिनीच्या क्षेत्राव्यतिरिक्त वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील इतर नियम व मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदी शासकीय जमिनीचे मुल्यांकन करताना तशाच लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. का. घरत )
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रत :- सर्व विभागीय आयुक्त,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उपविभागीय अधिकारी
सर्व तहसिलदार
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (निवड नस्ती).